# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## अग्निशमन विभाग
### अग्निशमन केंद्र मुख्यालय, माळीवाडा, अहमदनगर.

संदर्भ : १) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक अशंस-०६१२/प्र.क्र.१२९/नवि-२०, मंत्रालय मुंबई दिनांक २१ जून २०१२

२) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक अशंस-०६१२/प्र.क्र.१३०/नवि-२०. मंत्रालय मुंबई दिनांक २५ जून २०१२

राज्यातील सर्व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालये तसेच
महानगरपालिकेची स्वत:ची कार्यालये यासह सार्वजनिक वापराच्या व लोकांची
वर्दळ असणाऱ्या खाजगी इमारती. (उदा. सिनेमा हॉल्स, नाट्यगृहे, इस्पितळे,
वाणिज्य/व्यापारी संकुल, मॉल्स, तारांकित हॉटेल्स, मोठी व्यावसायिक
कार्यालये इ.) या इमारतीमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण (Fire Safety
Audit) करून घेणे महाराष्ट्र आगप्रतिबंधक जीवसुरक्षा अधिनियम २००६ चे
कलम ३(१) नुसार बंधनकारक असून असे परिक्षण (Fire Safety Audit)
सदर अधिनियमातील कलम ३(३) नुसार अनुज्ञप्तीधारक अभिकरणा
(Licensed Agency) कडून करून घेवून सदर अहवाल वर्षातून दोन वेळा
माहे जानेवारी व जुलै मध्ये मुख्य अग्निशामक अधिकारी यांना सादर करावयाचा
असून खाजगी इमारतीमध्ये सदर जबाबदारी इमारतीचे मालक अथवा
भोगवटादार यांची आहे. याबाबत अहमदनगर महानगरपालिकेतर्फे यापूर्वी वेळोवेळी
वर्तमानपत्रातून जाहीर सूचना प्रसिद्ध करणेत आलेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार महाराष्ट्र शासनातर्फे वर निर्देशित सर्व
इमारतीचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण (Fire Safety Audit) एक महिन्याच्या
आत करून अपूर्ततेची पूर्तता करून तीन महिने (३० जुलै २०१८ पर्यंत)
च्या कालावधीत पूर्ण करून घेणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यासाठी महाराष्ट्र
आगप्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम
१ नुसार शासनाने नियुक्त केलेल्या अनुज्ञप्तीधारक अभिकरण (Licensed
Agency) कडून तातडीने इमारतीचे परिक्षण करून अहवाल मुख्य अग्निशामक
अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका, मध्यवर्ती अग्निशमन केंद्र
मुख्यालय, माळीवाडा, अहमदनगर यांचेकडेस सादर करण्यात यावा.
मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी नोंदणीकृत केलेल्या अनुज्ञप्तीधारक
अभिकरणाची (Licensed Agency) यादी पुढील संकेतस्थळावर उपलब्ध
आहे- www.mahafireservices.gov.in

सबब अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व शासकीय / निमशासकीय
कार्यालयांचे कार्यालय प्रमुख तसेच सार्वजनिक वापराच्या उपरोक्त निर्देशित
खाजगी इमारतीचे मालक / भोगवटादार यांनी मा.शासनाच्या निर्देशानुसार
त्यांचे इमारतीचे अग्निसुरक्षेचे परिक्षण करणेसाठी येणाऱ्या अनुज्ञप्तीधारक
अभिकरणास आवश्यक माहिती / नकाशे उपलब्ध करून सहकार्य करावे असे
आवाहन करणेत येत आहे.

मुख्य अग्निशामक अधिकारी
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

आयुक्त
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर